manupatra®

# Marathi

# केशवानंद भारती
# विरुद्ध
# केरळ राज्य

मनु/ एस सी/0445/1973




## घटनाक्रम

स्वामी श्री एच एच श्री केशवानंद भारती, जे "एडनीर मठा" चे प्रमुख होते, त्यांनी केरळ राज्य सरकारच्या २ राज्य भू-सुधारणा कायद्यांतर्गत मठाच्या जमीनीच्या व्यवस्थेत निर्बंध लागू करण्याच्या प्रयत्नांना आव्हान दिले. त्यांनी अनुच्छेद २६ अंतर्गत सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय धार्मिक जमीन व्यवस्थापन करण्याच्या अधिकाराबद्दल रिट याचिका दाखल केली.

संविधानात १९७१-७२ च्या काळात झालेल्या सुधारणांप्रमाणे ही कलमे नवव्या अनुसूचीमध्ये जोडण्यात आली:

- केरळ भू-सुधारणा (सुधारणा) कायदा, १९६९ (केरला अॅक्ट 35 ऑफ 1969)
- केरळ भू-सुधारणा (सुधारणा) कायदा, १९७१ (केरला अॅक्ट 25 ऑफ 1971)

यावर याचिकाकर्त्याने या सुधारणेला आव्हान देण्यासाठी अतिरिक्त कारणे आणि रिट याचिकेत दुरुस्तीची विनंती केली.





## कायद्याचे प्रश्न

अनुच्छेद १३(२) जे राज्यकर्त्यांवर मूलभूत अधिकारांविरुद्ध कायदे बनवण्यावर निर्बंध आणते) शिवाय, संविधानाच्या अनुच्छेद ३६८ अंतर्गत संसदेकडे कितपत सुधारणेचा अधिकार आहे?

# निर्णय

न्यायालयाने गोलखनाथ विरुद्ध पंजाब राज्यामध्ये दिलेल्या निर्णयाची पुनर्तपासणी करुन २४, २५, २६ आणे २९ व्या सुधारणेंच्या वैधतेची पडताळणी केली. १३ न्यायाधीशांच्या संविधानपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. ७-६ च्या फरकाने, तीव्रपणे विभाजित केलेल्या निकालात, न्यायालयाने असे मानले की संसदेला "विस्तृत" अधिकार असताना, तिच्याकडे संविधानातील मूलभूत घटक किंवा मूलभूत वैशिष्ट्ये नष्ट करण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार नाही.

- गोलखनाथ विरुद्ध पंजाब राज्य, AIR 1967 SC 1643 चा निर्णय रद्द करण्यात आला. (या याचिकेचा निर्णय संसदेकडे मूलभूत हक्क सुधारण्याचा अधिकार नाही असा होता.)

- संविधान (२४ वी सुधारणा) कायदा, १९७१ वैध ठरवला गेला. या अंतर्गत संसदेला घटनेच्या कुठल्याही भागात सुधारणा करण्याचा अधिकार देण्यात आला होता.

- अनुच्छेद ३६८, सुधारणेप्रमाणे वैध असून संसदेला संविधानाची मूलभूत रचना किंवा चौकट बदलण्याचा अधिकार नाही. पण न्यायालयानी " संविधानाची मूलभूत रचना " म्हणजे काय याची विस्तारित व्याख्या न देता फक्त काही उदाहरणे दिली. अनुच्छेद ३१(ग) ची सुधारणा अवैध ठरवण्यात आली.







एच.आर. खन्ना, न्यायाधिश:

"संविधान हा एक दरवाजा नसून एक रस्ता आहे. संविधान घडवण्यात याची जाणीव सतत आहे की परिस्थिती तटस्थ, स्थिर नसून सतत बदलणारी, पुढे चालणारी आहे. एक प्रगतीशील देश हा, माणसा सारखाच, स्थिर आणि स्तब्ध नसून गतिमान आणि धडाकेबाज असतो. त्यामुळे संविधानातसुद्धा प्रशासनाच्या कार्यात प्रयोग आणि चाचणीसाठीपुरेशी तरतूद असली पाहिजे. एक संविधान हे द्वंद्ववादाचे कागदपत्र नसून सामान्य लोकांच्या जीवनाला सुकर करण्याचे साधन आहे."

एस.एम. सिकरी, मुख्य न्यायाधिश:

"संविधानातील प्रत्येक तरतूद बदलली जाऊ शकते - फक्त संविधानाचा पाया आणि रचना कायम असायला हवी. मूलभूत संरचनेत खालील वैशिष्ट्ये आहेत असे म्हटले जाऊ शकते:



- संविधानाचे वर्चस्व
- प्रजासत्ताक आणि लोकशाहीवादी सरकार
- धर्मनिरपेक्षता
- न्यायपालिका, कार्यकारी आणि विधिमंडळ यांच्यातील अधिकारांचे पृथक्करण
- संविधानाचे फेडरल वैशिष्ट्य

आणि या रचनेचा मूलभूत पाया आहे : प्रत्येक व्यक्तिची प्रतिष्ठा आणि व्यक्तिस्वातंत्र्य हे सगळयात महत्त्वाचे आहे. हे कुठल्याही सुधारणेनी नष्ट केले जाऊ शकत नाही."

